भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

**आरबीआय/२०१३-१४/४७**
**डीएनबीए (पीडी).सीसी.क्र. ३४६/०३.०२.००१/२०१३-१४** **जुलै १, २०१३**

सर्व अबँकीय वित्तीय कंपन्या

महोदय,

**महापरिपत्रक २०१३ - एनबीएफसीद्वारे विदेशात शाखा - दुय्यम कंपनी - संयुक्त उद्योग - प्रतिनिधी कार्यालय किंवा गुंतवणुक करणे.**

आपणास महितच आहे की, ह्या विषयावरील सर्व सूचना एकाच जागी मिळाव्यात ह्यासाठी, रिझर्व बँक अद्यावत परिपत्रके/अधिसूचना देत असते. वरील विषयावरील सूचना खाली पुनः देण्यात येत आहेत. ही अधिसूचना रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आली आहे.

आपला

(एन एस विश्वनाथन)
प्रमुख मुख्य महाव्यवस्थापक

अनुक्रमणिका


| परिच्छेद क्र. | तपशील |
|---|---|
| १. | एनबीएफसींद्वारे विदेशात गुंतवणुक डीएनबीएस - आरबीआयकडून ना-हरकत (एनओसी) |
| २. | अबँकीय वित्तीय कंपन्या (विदेशात शाखा/दुय्यम संस्था/संयुक्त उद्योग/प्रतिनिधिक कार्यालय उघडणे किंवा एनबीएफसींद्वारा विदेशात गुंतवणुक करणे ) निदेश, २०११ |
| २.१ | विदेशात शाखा/दुय्यम संस्था/संयुक्त उद्योग/प्रतिनिधिक कार्यालय उघडणे किंवा एनबीएफसींद्वारा विदेशात गुंतवणुक करण्याबाबत आरबीआयची पूर्व मंजुरी घेणे. |
| २.२ | सर्वसाधारण अटी |
| २.३ | विशिष्ट अटी |
| | (अ) शाखा उघडणे |
| | (ब) एनबीएफसीद्वारा विदेशात दुय्यम संस्था उघडणे |
| | (क) विदेशात संयुक्त उद्योग उघडणे |
| | (ड) एनबीएफसी द्वारे विदेशात प्रतिनिधिक कार्यालये उघडणे. |
| | परिशिष्ट |

**१.एनबीएफसींद्वारे विदेशात गुंतवणुक - आरबीआयच्या डीएनबीएसकडून नाहरकत(एनओसी)**

विदेशी मुद्रा व्यवस्थापन (कोणत्याही विदेशी प्रतिभूतीचे हस्तांतरण किंवा इश्यु) (सुधारणा) विनियम, २००४, दि. जुलै ०७, २००४च्या विनियम क्र ७ चा संदर्भ घेण्यास एनबीएफसींना सांगण्यात आले होते त्या विनियमानुसार, वित्तीय कार्यकृती क्षेत्रात भारताबाहेर कार्य करणाऱ्या एखाद्या संस्थेत गुंतवणुक करण्यासाठी, एखाद्या भारतीय पक्षाला, भारत तसेच विदेशातील संबंधित विनियामक प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. ह्याशिवाय आरबीआयच्या विदेशी मुद्रा व्यवस्थापनाने जुलै ०१, २००९ रोजी विदेशातील संयुक्त उद्योग (जेव्ही)/संपूर्ण मालकीची दुय्यम संस्था (डब्ल्युओएस) ह्यात थेट गुंतवणुक करण्यावरील महापरिपत्रकाच्या परिच्छेद ५.३ अनुसार, विदेशातील कोणत्याही व्यवसायात/कार्यकृतीत गुंतवणुकी करणाऱ्या, वित्तीय क्षेत्रातील विनियमित संस्थांना वरील विनियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

असे काही प्रसंग नजरेस आले आहेत की जेथे एनबीएफसींनी, भारतीय रिझर्व बँकेच्या डीएनबीएसकडून विनियात्मक नाहरकत घेतल्या शिवायच विदेशात गुंतवणुकी केल्या आहेत. एनबीएफसींद्वारा विनियात्मक नाहरकत घेतल्याशिवाय केलेल्या कोणात्याही गुंतवणुकी म्हणजे फेमा २००४ चे उल्लंघन ठरते व त्याबाबत दंडात्मक कारवाई लागु होईल.

ह्याबाबत, येथे पुनश्च सांगण्यात येत आहे की, विदेशात गुंतवणुकी करुन इच्छिणाऱ्या सर्व एनबीएफसींनी अशी गुंतवणुक करण्यापूर्वी, आरबीआयच्या डीएनबीसीच्या प्रादेशिक कार्यालयाकडून (त्या कंपनीचे पंजीकृत कार्यालय ज्या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात येते) "नाहरकत" (एनओसी) मिळवावी.

ह्याबाबतच्या अर्जात विदेशातील संस्था करत असलेल्या कार्यकृती स्पष्टपणे निर्देशित केलेल्या असाव्यात. एनबीएफसींनी नोंद घ्यावी की, वरील विनियमानुसार, फेमाखाली मंजुरी नसलेल्या कार्यकृती करणाऱ्या विदेशी संस्थांमध्ये थेट गुंतवणुक करण्यास परवानगी नाही.

**२.अबँकीय वित्तीय कंपन्या एनबीएफसीद्वारे विदेशात शाखा/दुय्यम संस्था/संयुक्त उद्योग/प्रतिनिधी कार्यालय उघडणे किंवा विदेशात थेट गुंतवणुक करणे निदेश, २०११**

**२.१ एनबीएफसीद्वारे विदेशात शाखा/दुय्यम संस्था/संयुक्त उद्योग/प्रतिनिधी कार्यालय उघडणे किंवा विदेशात थेट गुंतवणुक करणे अशा बाबतीत रिझर्व बँकेची पूर्व-मंजुरी**

१) कोणतीही एनबीएफसी, रिझर्व बँकेची लेखी पूर्व मंजुरी घेतल्याशिवाय विदेशात दुय्यम कंपनी/संयुक्त उद्योग/प्रतिनिधी कार्यालय उघडणार नाही किंवा कोणत्याही विदेशी संस्थेत गुंतवणुक करणार नाही. नाहरकत मिळविण्यासाठी एनबीएफसीने केलेल्या अर्जावर ह्या निदेशांनुसार विचार करण्यात येईल.

२) विदेशात शाखा उघडण्यासाठी किंवा संयुक्त उद्योग/संपूर्ण मालकीच्या दुय्यम कंपनीत गुंतवणुक करण्यासाठी, विदेशी मुद्रा व्यवस्थापनाने विहित केलेल्या निदेशांव्यतिरिक्त हे निदेश ही लागु होतील.

३) आरबीआयकडे पंजीकृत झालेल्या एनबीएफसीद्वारे (ठेवी स्वीकारणाऱ्या व न स्वीकारणाऱ्या) विदेशात दुय्यम संस्था/संयुक्त उद्योग/प्रतिनिधी कार्यालय ह्यांना परवानगी मिळण्यासाठी पुढील सर्वसाधारण व विशिष्ट अटी विहित करण्यात आल्या आहेत.

**२.२ सर्वसाधारण अटी**

अ) अ-वित्तीय सेवा क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी परवानगी नाही.

ब) फेमाखाली मनाई केलेल्या कार्यकृतींमध्ये किंवा सेक्टरल फंड्समध्ये थेट गुंतवणुक करण्यास परवानगी नाही.

क) यजमान देशातील वित्तीय क्षेत्र विनियामक प्राधिकरणाद्वारे विनियमित अशी मूळ कार्यकृती असलेल्या संस्थांमध्येच गुंतवणुकी करण्यास परवानगी दिली जाईल.

ड) विदेशातील एकूण गुंतवणुक एनओएफच्या १०० % पेक्षा अधिक नसावी. एखादी एकमेव संस्था व तिची स्टेप डाउन संस्था ह्यामध्ये इक्विटीच्या स्वरुपात किंवा निधी-आधारित दायित्व (कमिटमेंट) स्वरुपातील विदेशातील गुंतवणुक, त्या एनबीएफसीच्या निजनिधीच्या १५% पेक्षा अधिक नसावी.

ई) विदेशातील गुंतवणुकीमध्ये बहुस्तरीय, क्रॉस ज्युरिसडिक्शनल रचना असू नये. जास्तीत जास्त केवळ एकच मध्यस्थ होल्डिंग कंपनीला परवानगी दिली जाईल.

फ)

१) वेळोवेळी सुधारित केलेल्या अबँकीय वित्तीय (ठेवी स्वीकारणाऱ्या व धारण करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश २००७ अनुसार, ठेवी स्वीकारणाऱ्या एनबीएफसींच्या, विदेशातील दुय्यम संस्थेत गुंतवणुक केल्यानंतरचा सीआरएआर, ठेवी स्वीकारणाऱ्या एनबीएफसीना लागु होणाऱ्या सीआरएआरपेक्षा कमी असता कामा नये.

२) एनबीएफसी-एनडी-एसआय ह्यांनी विदेशातील दुय्यम कंपन्यात गुंतवणुक केल्यानंतरचा सीआरएआर, वेळोवेळी सुधारित केलेल्या अबँकीय वित्तीय (ठेवी न स्वीकारणाऱ्या किंवा धारण न करणाऱ्या) कंपन्या प्रुडेंशियल नॉर्म्स (रिझर्व बँक) निदेश २००७ अनुसार लागु असलेल्या सीआरएआरपेक्षा कमी असता कामा नये.

३) ठेवी न स्वीकारणाऱ्या एनबीएफसींना (एनबीएफसी-एनडी-एसआय सोडून) विदेशातील दुय्यम कंपनीत गुंतवणुक केल्यानंतरचा सीआरएआर, १०% पेक्षा कमी नसावे किंवा वेळोवेळी बदल केल्यानुसार कमी नसावा.

ग) आरबीआय अधिनियम १९३४ च्या कलम ४५-आयएला दिलेल्या स्पष्टीकरणात विहित केल्याप्रमाणे, एनबीएफसीने, विदेशातील प्रायोजित दुय्यम संस्था/गुंतवणुक ह्यात केलेल्या गुंतवणुकी हिशेब केल्यानंतर एनओएफचा आवश्यक तो स्तर ठेवत रहावा.

ह) एनबीएफसीच्य निव्वळ अ-कार्यकारी ॲसेट्सचा स्तर नक्त अग्रिम राशींच्या ५% पेक्षा अधिक असू नये.

आय) त्या एनबीएफसीने गेली तीन वर्षे नफा मिळवला असला पाहिजे आणि ती सुरु असे पर्यंत तिची सर्वसाधारण कामगिरी समाधानकारक असली पाहिजे.

ज) फेमा १९९९ खाली वेळोवेळी दिल्या गेलेल्या विनियमांचे पालन त्या एनबीएफसीद्वारा केले गेले पाहिजे.

के) त्या एनबीएफसीने सार्वजनिक ठेवी धारण केल्या असल्यास विनियमांचे पालन व त्याबाबतची कार्यवाही तिने केली पाहिजे.

ल) एनबीएफसीने केवायसी मापदंडांचे पालन करावे.

म) विदेशात स्थापन केलेले एसपीव्ही किंवा विदेशात झालेली प्राप्ती हे, विदेशातील संस्थेत केलेल्या गुंतवणुकीच्या टक्केवारीच्या अनुसार, गुंतवणुक किंवा दुय्यम संस्था/संयुक्त उद्योग समजले जातील.

न) विदेशात गुंतवणुक करण्यासाठी असलेल्या ह्या मार्गदर्शक तत्वांखालील सर्व अटींचे पालन करण्यात आले आहे असे वार्षिक प्रमाणपत्र वैधानिक ऑडिटर्सकडून घेऊन ते, त्या एनबीएफसीना, ती जेथे पंजीकृत झाली आहे त्या डीएनबीएसच्या प्रादेशिक कार्यालयाकडे सादर करावयाचे आहे.

ओ) सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये तिमाही अहवाल, एनबीएफसीने, डीएनबीएसच्या प्रादेशिक कार्यालयाकडे तसेच आकडेशास्त्र व माहिती व्यवस्थापन विभागाकडे (डीएसआयएम) सादर करावयाचा आहे.

पी) ह्या बँकेच्या नजरेस काही विपरीत बाबी आल्यास दिलेली परवानगी काढून घेतली जाईल. विदेशात करावयाच्या गुंतवणुकीबाबत दिल्या गेलेल्या सर्व मंजुरींना ही अट लागु आहे.

**२.३ विशिष्ट अटी**

(अ) शाखा उघडणे

सर्वसाधारण धोरण म्हणून एनबीएफसींना विदेशात शाखा उघडण्यास परवानगी नाही. तथापि, वित्तीय व्यवसाय करण्यासाठी विदेशात आधीच शाखा उघडलेल्या अबँकीय वित्तीय कंपन्यांना त्या सुरु ठेवण्याची परवानगी, लागु असलेल्या सुधारित मार्गदर्शक तत्वांचे पालन केले असल्यास दिली जाईल.

ब) एबीएफसीद्वारे विदेशात दुय्यम कंपनी उघडणे

एनबीएफसींद्वारे विदेशात दुय्यम कंपनी उघडण्याबाबत, वर दिलेल्या सर्व अटी लागु आहेत. ह्या बँकेने दिलेल्या नाहरकतीचा विदेशातील विनियमक प्राधिकरणांच्या मंजुरीशी काहीही संबंध नसेल.
ह्याशिवाय, पुढील वैधानिक अटी तयार करण्यात आल्या असून त्या सर्व एनबीएफसींना लागु असतीलः-

अ) विदेशात दुय्यम कंपनी उघडल्यास, मूळ एनबीएफसीला अशा दुय्यम कंपन्यांना किंवा त्यांच्या वतीने गर्भित (इंप्लिसिट) किंवा निःसंदिग्घ (एक्सप्लिसिट) हमी देण्यास परवानगी दिली जाणार नाही.
ब) विदेशातील दुय्यम कंपनीच्या लाभार्थ भारतातील कोणत्याही संस्थेकडून लेटर ऑफ कंफर्ट देण्याची विनंती करण्यास परवानगी जाणार नाही.
क) विदेशातील प्रायोजित दुय्यम कंपनीमधील एनबीएफसीचे दायित्व/जबाबदारी ही केवळ त्या दुय्यम कंपनीबाबतच्या इक्विटी आधारित किंवा निधी आधारित दायित्वापुरतीच असेल. ह्याची खात्री करुन घेतली जावी.
ड) विदेशात स्थापन केली जाणारी दुय्यम कंपनी ही एक "शेल कंपनी" म्हणजे "सुसंस्थापित केली गेलेली परंतु लक्षणीय ॲसेट्स किंवा कार्यकृती नसलेली" नसावी. तथापि, वित्तीय सल्लागाराचा व्यवसाय करणाऱ्या परंतु लक्षणीय ॲसेट्स नसलेल्या कंपन्यांना शेल कंपन्या समजले जाणार नाही.
ई) एनबीएफसीद्वारे विदेशात स्थापन केल्या जाणाऱ्या दुय्यम कंपनीचा उपयोग भारतात कार्यकृती करण्यासाठी भारतात मालमत्ता निर्माण करण्यासाठी स्त्रोत निर्माण करण्यासाठी करण्यात येऊ नये.
फ) ह्या तरतुदींचे अनुपालन होत असल्याची खात्री करुन घेण्यासाठी, मूळ एनबीएफसीने, विदेशातील ती दुय्यम कंपनी करत असलेल्या व्यवसायाबाबत नियतकालिक रिपोर्ट/ऑडिट रिपोर्ट्स मागवावेत व ते रिझर्व बँकेला व तिच्या निरीक्षक अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन द्यावेत.
ग) विदेशातील अशी दुय्यम कंपनी कोणताही व्यवसाय करत नसेल किंवा असे रिपोर्ट्स दिले जात नसल्यास, विदेशात ती दुय्यम कंपनी स्थापन करण्यासाठी दिलेल्या मंजुरीचा पुनर्विचार केला जाईल/काढून घेतली जाईल.
ह) कोणत्याही एनबीएफसीला विदेशात दुय्यम कंपनी स्थापन करण्यासाठी दिलेल्या परवानगीसाठी असलेली अट म्हणजे त्या दुय्यम कंपनीने तिच्या ताळेबंदात स्पष्टपणे निर्देशित करावे की मूळ संस्थेचे, विदेशातील प्रायोजित दुय्यम कंपनीबाबतची जबाबदारी, इक्विटी आधारित किंवा निधी आधारित जबाबदारी पुरतीच असेल.
आय) विदेशातील त्या दुय्यम कंपनीच्या सर्व कार्यकृती, यजमान देशातील विनियामक अटींचे पालन करणाऱ्याच असतील.

(सी) विदेशातील संयुक्त उद्योग : विदेशातील दुय्यम कंपन्या सोडून अन्य प्रकारच्या विदेशातील गुंतवणुकींनाही, दुय्यम कंपन्यांना लागु असणारी तीच मार्गदर्शक तत्वे लागु असतील.

(डी) एनबीएफसीद्वारे विदेशात प्रतिनिधी कार्यालये उघडणे : संपर्क कार्य (लायाजन) बाजार-अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी विदेशात प्रतिनिधी कार्यालये स्थापन करता येऊ शकतात. परंतु ह्यात निधी खर्च होणारी कार्यकृती नसावी. मात्र त्यासाठीही यजमान देशातील विनियामक प्राधिकरणाच्या विनियमांचे पालन झाले असावे. अशा कार्यालयाबाबत संपर्क-कार्यशिवाय अन्य कार्य होण्याची शक्यता नसल्याने त्यासाठी कर्जसुविधा संभवत नाही.

मूळ एनबीएफसीने विदेशातील अशा प्रतिनिधी कार्यालयाने केलेल्या/करत असलेल्या व्यवसायाचा नियतकालिक रिपोर्ट घ्यावा. त्या प्रतिनिही कार्यालयाने कोणताही व्यवसाय केला नसल्यास किंवा असे रिपोर्ट्स न मिळाल्यास त्यासाठी दिलेल्या मंजुरीवर फेरविचार करण्यात येईल/काढून घेतली जाईल.

३) मिळालेला अनुभवानुसार ह्या धोरणाचे पुनरावलोकन केले जाईल.
४) ह्या निदेशाचे उल्लंघन केले गेल्यास, रिझर्व बँक अधिनियम १९३४ च्या तरतुदीखाली ते दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

**जोडपत्र**

<u>**विदेशात गुंतवणुक करणाऱ्या एनबीएफसींनी सादर करावयाचा तिमाही अहवाल - मार्च ३१/जून३०/सप्टेंबर ३०/डिसेंबर ३१**</u>

| **अनुक्रमांक** | **डब्ल्युओएस/जेव्हीचे नाव** (जेव्हीसाठी भागीदारांची नावे द्यावीत. | **देश व सुसंस्थापनेची तारीख** | **डीएनबीएसकडील एनओसीची तारीख** | **करत असलेला व्यवसाय** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

<table>
<tr><td>अनु.क्र.</td><td>कालावधीच्या अखेरीस असलेले पॅरामीटर्स</td><td></td></tr>
<tr><td>अ</td><td>सीआरएआर</td><td></td></tr>
<tr><td>ब)</td><td>एनओएफ</td><td></td></tr>
<tr><td>क)</td><td>शेवटच्या ऑडिटेड ताळेबंदानुसार एनबीएफसीचा निव्वळ नफा</td><td></td></tr>
<tr><td>ड)</td><td colspan="2">तिमाहीमध्ये डब्ल्युओएस/जेव्हीला प्रेषण केलेली रक्कम<br>
<table><tr><td>डब्ल्युओएस/जेव्हीचे नाव</td><td>प्रेषण केलेली रक्कम</td></tr><tr><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>ई)</td><td colspan="2">तिमाहीच्या अखेरीस, डब्ल्युओएस/जेव्हीमध्ये संचयित गुंतवणुक (क्युम्युलेटिव) (इक्विटी/निधी आधारित दायित्व) (एनबीएफसीच्या निजनिधीची टक्केवारी व रक्कम)<br>
<table><tr><td>डब्ल्युओएस/जेव्हीचे नाव</td><td>प्रेषण केलेली रक्कम व स्टेप डाउन संस्थांसह निजनिधी %</td></tr><tr><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>फ)</td><td>एनबीएफसीच्या एनओएफची टक्केवारीच्या स्वरुपात त्या एनबीएफसीची विदेशातील एकूण गुंतवणुक</td><td></td></tr>
<tr><td>ह)</td><td colspan="2">विदेशातील डब्ल्युओएस/जेव्ही यजमानदेशात विनियमित आहे काय? होय असल्यास-<br>
<table><tr><td>विनियमाकाचे नावः</td><td>अहवाल काळात विनियामक भेटी दिल्या होत्या कायः</td><td>विनियामकाने उपस्थित केलेले प्रश्न/हरकतीः</td><td>दुय्यम संस्थेच्या व्यापारावर परिणाम करु शकणारे ह्या काळातील विनियामक बदल :</td><td>विदेशातील विनियामकाने आकारलेला दंड/कारवाईः</td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>ज)</td><td colspan="2">हमी, लेटर ऑफ कंफर्ट ह्यासह एक मूळ एनबीएफसीने जेव्ही/डब्ल्युओएसला सहाय्य करण्याचे स्वरुप (तंत्रज्ञानासह अन्य प्रकारचे सहाय्य केले असल्यास ते निर्देशित करावे.<br>
<table><tr><td>डब्ल्युओएस/जेव्हीचे नाव</td><td>सहाय्याचे स्वरुप</td></tr><tr><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>के)</td><td colspan="2">तिमाहीमध्ये डब्ल्युओएस/जेव्हीकडून मिळालेले अहवाल (रिटर्न्स)<br>
<table><tr><td>डब्ल्युओएस/जेव्हीचे नाव</td><td>मिळालेला रिटर्न्स</td></tr><tr><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>ल)</td><td colspan="2"><table><tr><td>डब्ल्युओएस/जेव्हीचे नाव</td><td>नक्त नफा</td><td>ॲसेटचे आकारमान (ॲसेट्सच्या लक्षणीय बाबी व जबाबसाऱ्या देण्यात याव्यात.</td></tr><tr><td></td><td></td><td></td></tr></table>
जेव्ही/डब्ल्युओएसचा वित्तीय तपशील</td></tr>
</table>

**परिशिष्ट**

| क्र | परिपत्रक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|
| १ | डीएनबीएस (पीडी).सीसी.क्र.१७३/०३.१०.०१/२००९-१० | मे ०३, २०१० |
| २ | डीएनबीएस (पीडी) सीसी.क्र. २२२/०३.१०.००१/२०१०-११ | जून १४, २०११ |